## मुददा क्रमाक ८

राज्यामध्ये नुकतीच महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाची स्थापना झालेली आहे. या मंडळाची रचना शासन निर्णय क्रमांक मंडळ २००५ / प्र. क्र. ४८, ९-अे, दिंनाक २४ ऑगस्ट २००५ अन्वये निश्चित करण्यात आलेले आहे. या राज्यस्तरीय मंडळा व्यतीरिक्त राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाअंतर्गत प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हा अभियान समिती स्थापन करण्यात आलेली आहे. जिल्हा अभियान समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे सदस्य सचिव म्हणुन काम करणार आहेत. या समितीची रचना ही या शासन निर्णयामध्ये समाविष्ट आहे. याशिवाय कृषि विभागामध्ये जिल्हा ते राज्यस्तरावर विविध योजनांअतर्गत समित्या कार्यरत असुन या समित्यांच्या बैठका नागरीकांना उपलब्ध नसल्या तरी त्याची कार्यवृत्ताते नागरीकांना उपलब्ध होतील.